# मुंबई विद्यापीठ

कुलसचिव यांचे
कार्यालय
फोर्ट परिसर, मुंबई
विद्यापीठ,
मुंबई ४०० ०३२

---

## परिपत्रक

No. REG/ICC/2020-21-07

**विषय :** कोविड -१९ या जागतिक महामारीमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क (Tuition Fees) संदर्भात.

**संदर्भ :**१) विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र क्रमांक D.O.No.F.1-1/2020/UGC (TF-COVID-19/Fee) दिनांक २७ मे, २०२०.

२) विद्यापीठाचे परिपत्रक क्र REG/ECC/2020-21-UG 1, दिनांक २१ जुन, २०२०.

उपरोक्त नमुद विषय तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाचे संदर्भांकित पत्र क्रमांक १ व विद्यापीठाचे परिपत्रक संदर्भ क्रमांक २ नुसार मुंबई विद्यापीठाशी संलग्नित/संचलित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक / विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की, कोविड – १९ या जागतिक महामारीमुळे दिनांक २३ मार्च, २०२० पासून केंद्र शासनाने संपर्ण देशात टाळेबंदी जाहीर केलेली आहे. त्यामुळे राज्यातील उद्योगधंदे / व्यवसाय /खाजगी नोकरी इत्यादी क्षेत्राात काम करणा—या नागरिकांच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम झालेला आहे

यास्तव, सदर आर्थिक परिस्थीतीचा विचार करता सर्व सबंधितांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१ या वर्षाकरीता कोणत्याही शैक्षणिक शुल्कात वाढ करु नये तसेच गरजू विद्यार्थ्याने विनंती केल्यास त्याच्या आर्थिक परिस्थीतीचा विचार करुन तसेच स्वयं अर्थ साहाय्यित (Self Financing) अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क (Tuition Fees) अदा करण्यासाठी चार हप्त्यांपर्यंतची (Instalments) सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.

यांसदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने सुध्दा उपरोक्त संदर्भाकिंत पत्रान्वये विद्यापीठांना व महाविद्यालयांना सुचना दिलेल्या आहेत, याचे काटेकोर पालन करावे.

**ठिकाण : मुंबई -४०००३२** **(डॉ. विनोद पाटील)**
**दिनांक : २० ऑगस्ट, २०२०** **प्रभारी कुलसचिव**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी —**

विद्यापीठाशी संलग्नित व संचलित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक / विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख, उपकुलसचिव, पदवी व पदव्युत्तर विभाग.

स्वीय सह्यय्यक १) कुलगुरु २) प्र—कुलगुरु ३) कुलसचिव ४) संचालक, प व मु मंडळ.